पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक: नस/४/कावि/५००/२०१४
दिनांक : ११/०६/२०१४

प्रति,

मा. ....................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी  ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/०६/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जून २०१४ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०/०६/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## सूचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये )

कार्यपत्रिका क्रमांक ३१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जून २०१४ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०/०६/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

----------

(अ) मा.महापालिका विशेष सभा क्र.२७ दि.२४/०२/२०१४ व दि.२८/०२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

### नियुक्त्या

विषय क्रमांक :- १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे खालील ४ (चार) विशेष समित्या नेमणे :-

(१) विधी समिती -
(टिप-विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(२) महिला व बालकल्याण समिती –
अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.
ब) महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

(३) शहर सुधारणा समिती

( टिप - शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(४) क्रिडा समिती

( टिप - क्रिडा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

( टिप - उपरोक्त क्र.१ ते ४ प्रमाणेच्या विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत.)

----------

## <u>प्रश्नोत्तरे</u>

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये)

----------

## <u>मा.स्थायी समितीचे ठराव</u>

**विषय क्रमांक २)** संदर्भ - १) मा.सदगुरु कदम, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव -

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २०/०५/२०१४ ठराव क्रमांक ६८६१ नुसार.

वैष्णवी विनोद जगताप हिने नॅशनल पॅरा ऑलम्पिक स्पर्धेत सहा सुवर्ण, एक कास्य पदक मिळविले असून तिची दिनांक ६ ते १० ऑगष्ट २०१४ या कालावधीत पॅसेडेना (कॅलिफोर्निया अमेरिका) येथील जागतिक पॅराऑलम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सदर खेळाडू महापालिकेच्या दत्तक खेळाडू योजनेची सभासद असून सदर स्पर्धेत भाग घेणेसाठी येणारा खर्च त्यांच्या आवाक्या बाहेरचा असल्याने विशेष बाब म्हणून त्यांस र.रु.दोन लाख नव्वद हजार अर्थसहाय्य मंजूर करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

----------

## <u>समित्यांचे अहवाल</u>

### <u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>

**विषय क्रमांक ३)** दिनांक २६/०३/२०१४ व ०९/०४/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

### <u>मा.शहर सुधारणा समिती</u>

**विषय क्रमांक ४)** (अ) दिनांक २०/०२/२०१४, २५/०२/२०१४, ०५/०३/२०१४ व १९/०३/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.

(ब) दिनांक ०५/०३/२०१४ व १९/०३/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.

----------



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५००/२०१४
दिनांक : ११/०६/२०१४

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.